**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी**
**बांधकाम विभाग**

**प्रस्तावना :-**

**विषय :- प्रभाग समिती क्रं.1 अंतर्गत वॉर्ड क्रं.11 व 12 जब्बार कंपाउंड, किदवाईनगर, न्यु आझादनगर परिसरात गटार व नाला बांधणे तसेच पेव्हरब्लॉकने पायवाट तयार करणे.**

प्रभाग समिती क्रं.1 अंतर्गत वॉर्ड क्रं.11 व 12 जब्बार कंपाउंड, किदवाईनगर, न्यु आझादनगर परिसरात गटार व नाला बांधणे तसेच पेव्हरब्लॉकने पायवाट तयार करणेकामी श्री.अन्सारी मो.हलीम मो.हारुन मा.नगरसेवक यांनी पत्राव्दारे मागणी केली आहे. किदवाईनगर येथील नाला खुपच अरुंद असुन पावसाळयात पाणी साचुन रस्त्यावर येत आहे त्यामुळे परिसरातील नागरीकांना रहदारीस अडथळा निर्माण होत आहे. तसेच सदर परिसरातील घर नं.266/3/2, 1087, 6162, 2727, 296, 2992, 129, 2068, 1312, 2357, 3573, 3233, 298/2 येथील गटारे अत्यंत नादुरुस्त असुन दुरुस्ती करणे आवश्यक आहे. विषयांकीत कामामधील जब्बार कंपाउंड ते चांदणी हॉटेल ते रोजी हॉटेल येथील नाला व गटारी बनविणेबाबत मा.महासभेत प्रस्ताव सादर करण्यात आला असुन त्यास मा.महासभेने ठराव क्रं.722 दि.27/04/2022 नुसार मंजुरी देण्यात आली आहे. तसेच विषयांकीत ठिकाणी पायवाट तयार करणेबाबत मा.नगरसेवक यांनी पत्रामध्ये उल्लेख केला आहे. त्या अनुषंगाने विषयांकीत कामास रक्कम रुपये ४९,९३,०३१/- (अक्षरी एकोनपन्नास लाख त्रयांनवद हजार एकतीस मात्र ) इतका खर्चाचा प्रस्ताव सादर केला असता त्यास मा.आयुक्त सो यांनी दि.६/१२/२०२२ रोजी मंजुरी दिली आहे. तरी सदरचा प्रस्ताव प्रशासकीय मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे.

ठराव क्र.:- ६४ दिनांक :-२२/१२/२०२२

प्रभाग समिती क्रं.1 अंतर्गत वॉर्ड क्रं.11 व 12 जब्बार कंपाउंड, किदवाईनगर, न्यु आझादनगर परिसरात गटार व नाला बांधणे तसेच पेव्हरब्लॉकने पायवाट तयार करणे कामाचा रक्कम रुपये ४९,९३,०३१/- (अक्षरी एकोनपन्नास लाख त्रयांनवद हजार एकतीस मात्र) इतका खर्चाचा प्रस्ताव सादर केला असुन शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त् अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२)नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ (१अ) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विजयकुमार म्हसाळ,प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, प्रभाग समिती क्रं.1 अंतर्गत वॉर्ड क्रं.11 व 12 जब्बार कंपाउंड, किदवाईनगर, न्यु आझादनगर परिसरात गटार व नाला बांधणे तसेच पेव्हरब्लॉकने पायवाट तयार करण्यास प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी नि.श.महानगरपालिका